# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

*"Towards Global Technological Excellence"*

दु. . . (०७२१) २५३१९२९, २५३१९३० फॅक्स (०७२१) २५३१९३१

संकेत स्थळ : www.gcoea.ac.in ई मेल : principal@gcoea.ac.in


**परिपत्रक**

क्र.शाअमअ/अधिष्टाता (शै)/पदवी प्र.पत्र /२०२०-२१/२८९
दिनांक : १५/०४/२०२१

संस्थेतील शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये अंतिम वर्ष B.Tech. व M.Tech. विद्यार्थ्याचे पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र तयार करण्यासाठी **विद्यार्थ्याचे मराठी व इग्रजी मध्ये संपूर्ण नांव शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याप्रमाणे (Leaving Certificate)** तसेच आईचे नांव इग्रजी व मराठी मध्ये तसेच विद्यार्थ्याचे कलर फोटोसह (पासफोर्ट साईज) अचुक माहीती (ठळक अक्षरात ) विद्यार्थ्याकडुन **(मराठी नांवामध्ये अक्षरातील उकार, विलांटी, मात्रा अचुक )** भरुन घेवून अधिष्ठाता (शै) विभागास सादर करावी. विद्यार्थ्याचे नांवासमोर श्री. व विद्यार्थीनीचे नावासमोर कु. नमुद करावे. **विद्यार्थ्याचे नांव त्यांच्या प्रवेश घेतेवेळी शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याप्रमाणे (Leaving Certificate) पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्राकरीता माहीती सादर करण्यात येते.** सदर माहीती एकत्रित करुन पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र तयार करण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे विहीत नमुन्यात सादर करावयाची आहे. माहीतीचा विहीत नमुना खालील प्रमाणे आहे.

**यापूर्वी असे निदर्शनास आले की, उत्त्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याचे संपूर्ण नावाची यादी काही विभागाकडुन एकत्रित पाठविल्या जात नाही. विद्यार्थी प्रोव्हीजनल डिग्री करीता आल्यानंतर त्याचे नांव यादीमध्ये नसल्याने त्याचे उर्तीण झाल्याचे कागदपत्रे तयार नसतात. विद्यार्थी विभागामध्ये गेल्यानंतर त्याचे नांव पाठविल्या जाते पर्यायाने कागदपत्रे तयार करण्यास विलंब होतो. त्यामुळे संबधीत विद्यार्थ्यांना विनाकारण मानसिक त्रास सहन करावा लागतो. या बाबतीत प्राचार्य यांनी दखल घेवून नाराजी व्यक्त केली आहे.**

तरी, आपले विभागातील अंतिम वर्ष B.Tech. व M.Tech विद्यार्थ्याचे पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र तयार करण्याकरीता विद्यार्थ्याच्या आईचे व विद्यार्थ्याचे मराठी व इंग्रजी नावाची (B.Tech. व M.Tech स्वतंत्र) अचुक यादी **दि. ३०/०४/२०२१** पर्यत सादर करावी. तसेच उत्तीर्ण विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र मिळण्यापासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

सहपत्र/ खालील प्रमाणे प्रपत्र.

अधिष्टाता (शै)
शासकीय अभियात्रिकी महाविदयालय,
अमरावती.

प्रतः- १) प्राचार्य, शासकीय अभियात्रिकी महाविद्यालय, अमरावती यांना माहीती करीता सादर.
२) विभाग प्रमुख स्थापत्य, यंत्र, विद्युत, अणुविद्युत, उपकरणीकरण, संगणक, माहीती तंत्रज्ञान, यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
३) डाटा सेटंर सदर परिपत्रक संस्थेच्या वेबसाईडवर टाकण्याकरीता रवाना.

## प्रपत्र

| Sr No | Roll No | Name of Students (English) | Mother's Name (English) | Name of Students (Marathi) | Mother's Name (Marathi) | Photo of Students |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |